-२९१-

२२७

२७८ ९३४

विषय :- रासायनिक कारखान्याचे परिसरात अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी खबरदारी घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
क्रमांक: एनएसपी १०८८/१५४२६२/[१२०७]-ल-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २ मे, १९८८.

परिपत्रक:

भोपाळ येथे गॅस गळतीमुळे जी प्रचंड प्रमाणात जिवित हानी व वित्तहानी झाली. त्याचा गांभिर्याने विचार करून महाराष्ट्र शासनाने रासायनिक कारखान्याचे परिसरात अशा प्रकारे आपत्ती येऊ नये वा आल्यास त्याचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणेसाठी उचित कार्यवाही उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत करण्यात येत आहे.

बहुतांशी औद्योगिक क्षेत्रात जेथे रासायनिक कारखाने आहेत. अशा प्रतिबंधित व धोकादायक क्षेत्राचे परिसरात अनधिकृत झोपडपट्टया निर्माण झाल्या आहेत. अशा झोपडपट्टयांच्या रहिवाशा-व्यतिरिक्त व्यापारी उपयोग सुध्दा संबंधितांकडून होत आहे. ही बाब गंभीर आहे. त्यामुळे भोपाळसारखे प्रसंग आल्यास अशा झोपडपट्टयामधील अतिक्रमकांचे जिवीताला धोका संभवतो.

सर्व जिल्हाधिकारी यांना याद्वारे अशा सूचना देण्यात येत आहेत की, रासायनिक कारखाने असलेल्या क्षेत्राचे परिसरात अशा प्रकारे अनधिकृत झोपडपट्टया तयार होऊ नयेत याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याची दक्षता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे याबाबत आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना सर्व महसूल अधिका-यांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
31 MAY 1988
शाखा – RB

[ श्री. वि. विजूर ]
सहाय्यक सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग.